फोन नं. २६२६८११, २७४२९१० Email ID : ho@solapursiddheshwarbank.com


## संचालक मंडळ

**दि. ०४/०१/२०२३ पासून**

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश संगप्पा वाले | चेअरमन |
| २ | श्री. नरेंद्र महादेव गंभिरे | व्हा. चेअरमन |
| ३ | श्री. तुकाराम जिवबा काळे | संचालक |
| ४ | श्री. अशोक अण्णाराव लांबतुरे | संचालक |
| ५ | श्री. पशुपतीनाथ विजयकुमार माशाळ | संचालक |
| ६ | सौ. सुचेता मिलिंद थोबडे | संचालिका |
| ७ | सौ. रुपाली बसवराज बिराजदार | संचालिका |
| ८ | ॲड. श्री. मल्लिनाथ कल्याणप्पा पाटील | संचालक |
| ९ | श्री. शिवानंद बसवणप्पा कोनापुरे | संचालक |
| १० | श्री. बाळासाहेब मन्मथ आडके | संचालक |
| ११ | श्री. भीमाशंकर बाबुराव म्हेत्रे | संचालक |
| १२ | श्री. इरप्पा बसप्पा सालक्की | संचालक |
| १३ | श्री. प्रकाश मल्लिकार्जुन हत्ती | संचालक |
| १४ | श्री. सिध्देश्वर सुभाष मुनाळे | संचालक |
| १५ | श्री. महेश जगन्नाथ सिंदगी | संचालक |
| १६ | ॲड. श्री. धानय्या गुरुबसय्या चिवरी | तज्ञ संचालक |
| १७ | श्री. श्रीधर हेमंत रिसबूड CA | तज्ञ संचालक |
| १८ | श्री. संजय शिवकुमार घाळे | कार्यलक्षी संचालक |
| १९ | श्री. राजेश शांतमल कलशेट्टी | कार्यलक्षी संचालक |
| २० | श्री. राम ब. शर्मा | सरव्यवस्थापक |
| | **दि. ०३/०१/२०२३ पर्यंत** | |
| १ | श्री. प्रकाश संगप्पा वाले | चेअरमन |
| २ | श्री. नरेंद्र महादेव गंभिरे | व्हा. चेअरमन |
| ३ | श्री. तुकाराम जिवबा काळे | संचालक |
| ४ | श्री. मल्लिनाथ गंगाधर विभूते | संचालक |
| ५ | श्री. श्रीशैल रेवणसिध्द बनशेट्टी | संचालक |
| ६ | श्री. चंद्रकांत गुंडप्पा रमणशेट्टी | संचालक |
| ७ | श्री. बसवराज शंकरराव माशाळे | संचालक |
| ८ | श्री. अशोक अण्णाराव लांबतुरे | संचालक |
| ९ | श्री. पशुपतीनाथ विजयकुमार माशाळ | संचालक |
| १० | सौ. सुचेता मिलिंद थोबडे | संचालिका |
| ११ | ॲड. श्री. मल्लिनाथ कल्याणप्पा पाटील | संचालक |
| १२ | श्री. नागनाथ धर्मण्णा जावळे | संचालक |
| १३ | सौ. रुपाली बसवराज बिराजदार | संचालिका |
| १४ | ॲड. श्री. धानय्या गुरुबसय्या चिवरी | तज्ञ संचालक |
| १५ | श्री. श्रीधर हेमंत रिसबूड CA | तज्ञ संचालक |
| १६ | श्री. संजय शिवकुमार घाळे | कार्यलक्षी संचालक |
| १७ | श्री. चंद्रकांत कल्लप्पा म्हेत्रे | कार्यलक्षी संचालक |

फोन नं. २६२६८११, २७४२९१० Email ID : ho@solapursiddheshwarbank.com


## ANNEXURE - A

| | |
|---|---|
| Name of the Bank | **Solapur Siddheshwar Sahakari Bank Ltd., Solapur** |
| Head Office Address | 205, East Mangalwar Peth, V.G.Shivdare Bhavan, 1st Floor, Solapur-2 |
| Date of Registration & No. | 18-11-1974 / SUR/BNK/159. |
| Date & No. of RBI Licence | ACD/MH/61P/DATE 11-12-75 |
| Jurisdiction | Solapur, Pune, Osmanabad & Latur Districts. |

(Rs. in Lakhs)

| | | |
|---|---|---|
| 17 | No. of Branches including H.O. | |
| 24015 | Regular | Membership. |
| 2292 | Borrower | Nominal Membership. |
| 1285 | Non Borrower | |
| 1516.00 | Paid up Share Capital | |
| 7315.78 | Saving | Deposits |
| 3297.13 | Current | |
| 35,314.23 | Fixed | |
| 28,913.90 | Secured | Loan & Advances |
| 1768.61 | Unsecured | |
| 77.09% | Total % of Priority Sector | |
| 15.13% | Total % of Weaker Sector | |
| - | D.C.C. (F.D.O.D.) | Borrowing |
| 2017.25 | Other Bank | |
| 21,647.96 | Investment with other Banks , GOI & Mutual Fund | |
| 8.60% | Overdues. | |
| “A” | Audit Classification | |
| 511.99 | Profit for the year | |
| 26 | Sub-Staff | Total Staff. |
| 101 | Other Staff | |
| 56,080.71 | Working Capital | |

## ४९ व्या वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस

(फक्त बँकेच्या सभासदांकरिता)

**सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर या बँकेची ४९ वी वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार दि. ५ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी ४ वाजता आप्पासाहेब काडादी सभागृह, मार्केट यार्ड शाखा, श्री सिध्देश्वर मार्केट यार्ड, हैद्राबाद रोड, सोलापूर या ठिकाणी खालील विषयावर विचार-विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. बँकेच्या सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.**

### * सभेपुढील विषय *

**१) मागील दिनांक १० सप्टेंबर २०२२ रोजीच्या वार्षिक सर्व साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे. तसेच दि. २४ मार्च २०२३ रोजीच्या विशेष सर्व साधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.**

**२) ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, बँकेचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि तदनुषंगिक अन्य हिशोबपत्रके आणि विवरण पत्रके मंजूर करणे.**

**३) वर्ष २०२३-२४ साला करीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच वर्ष २०२२- २०२३ सालात अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.**

**४) वर्ष २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परीक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे.**

**५) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२२ - २३ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

**६) बँकेचे संचालक आणि त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

**७) संचालक मंडळाने तडजोडीने केलेल्या थकित कर्जाच्या वसुलीस मान्यता देणे.**

**८) प्रमाणित बुडीत कर्जे, वसुलीचा हक्क कायम ठेवून निर्लेखित करण्यास मान्यता देणे.**

**९) बँकेच्या उपयोगासाठी जागा खरेदीस मंजूरी देणे.**

**१०) वर्ष २०२३-२४ सालासाठी भारतीय रिर्झव्ह बँकेने मंजुरी दिलेल्या वैधानिक लेखा परीक्षक नियुक्तीस मान्यता देणे. तसेच समवर्ती लेखा परीक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देणे.**

**११) सन २०२३-२४ सालाकरिता बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.**

**१२) आजच्या सभेस अनुपस्थित राहिलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

**१३) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.**

स्थळ : सोलापूर.
दिनांक: १४/०७/२०२३

मा.संचालक मंडळाच्या आदेशावरून
**आर. बी. शर्मा**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सभासदांसाठी महत्वाच्या सूचना :**

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास, ती सभा त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या आर्ध्या तासानंतर घेतली जाईल. त्या सभेस उपस्थित असलेले सदस्य हे कोरम म्हणून समजले जातील.

२) आर्थिक वर्ष २०२२-२३ सालचा संचालक मंडळाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक इ.बँकेचे मुख्य कार्यालयात आणि सर्व शाखांमधून सभासदांकरिता उपलब्ध राहील.

३) दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रक यासंदर्भात काही प्रश्न असल्यास सभासदांनी दि.२८ जुलै २०२३ पूर्वी बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी अर्जाने कळवावेत. मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांचा विचार करण्यात येणार नाही.

४) सभासदांचा पत्ता बदललेला असल्यास त्याची नोंद बँकेकडे पुराव्यानिशी करावी. तसेच, ज्या सभासदांनी वारस नोंद केली नसेल, वारस नोंद करुन घ्यावी.

५) ज्या सभासदांनी मागील तीन वर्षापर्यंतचा लाभांश अद्याप नेला नसेल, त्यांनी तो त्वरीत घेऊन जावा. अन्यथा बँकेच्या पोट नियमानुसार सदरची रक्कम राखीव निधीस वर्ग केली जाईल.

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,**
**सस्नेह नमस्कार,**

सर्व प्रथम, सोलापूर सिध्देश्वर सहकारी बँक लि. सोलापूर या बँकेच्या वार्षिक सर्व साधारण सभेस उपस्थित सर्व सभासदांचे मी हार्दिक स्वागत करतो. दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील बँकेच्या एकंदर आर्थिक कामकाजाची प्रगती दर्शविणारी हिशोबपत्रके उदा: ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि इतर तदनुषंगिक विवरणपत्रके आणि संचालक मंडळाचा ४९ वा अहवाल आपणापुढे सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

गेल्या वर्षभरापासुन चालू असलेल्या रशिया-युक्रेन युध्दामुळे संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेवर संकट आलेले आहे. विशषे करुन युरोपियन देशात जीवनावश्यक वस्तूंची महागाई गगनाला भिडली आहे. क्रूड ऑईलचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे पेट्रोल, डीझेल यांचे भाव जागतिक बाजापेठेत वाढले आहेत. या परिस्थितीचा परिणाम अपरिहार्यपणे भारताच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे. वाढत्या महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी अमेरिकेने त्यांचे व्याजदर ०.५०% ने वाढवले तर आपल्या देशात देखील रिझर्व्ह बँकेने टप्या-टप्याने रेपो दर वाढवीत आणून ६.५०% पर्यंत आणला आहे. त्याचा परिणाम म्हणून बँकिंग इंडस्ट्री मध्ये ठेवी आणि कर्जे यांचे व्याजदर वाढण्यास सुरवात झाली आहे..

अशा प्रकारे एकंदर आव्हानात्मक परिस्थिती असून देखील, आपल्या बँकेची कामगिरी अहवाल वर्षात संस्मरणीय झाली आहे. विषेश करुन कर्ज वृध्दी, निव्वळ नफा आणि थकबाकी वसुली या आघाड्यावर बँकेने अतिशय लक्षणीय यश मिळविले आहे. हे नमूद करताना मला अतिशय आनंद होत आहे. बँकेच्या वतीने सर्व सभासद-ग्राहक यांचे या प्रसंगी मी मनापासून आभार मानत आहे.

आपल्या परवानगीने वर्ष २०२२- २३ सालातील बँकेच्या आर्थिक कामगिरीचा अहवाल खालीलप्रमाणे मी सादर करीत आहे.

**भागभांडवल : रु. १५.१६ कोटी :** ३१ मार्च २०२३ अखेर बँकेचे वसुल व विक्री झालेले भाग-भांडवल रु. १५१५.९९ लाख इतके आहे. गेल्या वर्षभरात नवीन भाग-भांडवल रु. ११८.९२ लाखाने वाढले तर शेअर्स राजीनामा/मयत या कारणाने परत केलेल्या भाग-भांडवलाची रक्कम रु. ५१.८९ लाख इतकी आहे. ३१ मार्च २०२३ अखेर एकूण भागधारक सभासद संख्या २४०१५ इतकी आहे.

**गंगाजळी व इतर निधी रु.५६.६१ कोटी :** दि.३१ मार्च २०२३ अळेर बँकेचा रिझर्व्ह फंड (गंगाजळी) आणि इतर स्वनिधी एकूण रु. ५६६१.३१ इतका असून गेल्या वर्षाच्या तुलनेत त्यामध्ये रु. ४०१.५६ लाखाची वाढ झाली आहे. बँकेच्या स्वनिधीत दरवर्षी चांगली वाढ होत असून बँकेचे भाग-भांडवल आणि स्वनिधी मिळून एकूण रु. ७१.७७ कोटी इतकी रक्कम होत असून बँकेच्या एकूण असेट्सच्या १२.८१% इतकी भांडवली रक्कम बँकेकडे आहे, ही गोष्ट बँकेची आर्थिक सक्षमता दर्शविणारी आहे.

नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) ९% इतके निश्चित केले आहे. आपल्या बँकेचे हे प्रमाण ३१ मार्च २०२३ अखेर १८.७७ % इतके आहे. याचाच अर्थ आपल्या बँकेचा भांडवली पाया अतिशय भक्कम आहे.

**ठेवी : रु. ४५९.२७ कोटी :** ३१ मार्च २०२३ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु. ४५९२७.१३ लाख रकमेच्या असून गेल्या वर्षाच्या तुलनेत ठेवीमध्ये रु. १८५४.९२ लाखाने वाढ झाली आहे.

रिझर्व्ह बँकेने रेपो रेट मध्ये वाढ केल्यापासून अनेक राष्ट्रीयकृत आणि प्रायव्हेट सेक्टर बँकांनी त्यांचे ठेवीवरील व्याजदर वाढविण्यास सुरुवात केली. त्यामुळे ठेवीच्या व्याजदरा मध्ये एक प्रकारे स्पर्धा सुरु झाली आहे. आपल्या बँकेची फंड्सची गरज, मुदत संपणाऱ्या आणि नुतनिकरण होणाऱ्या ठेवी, कर्ज मागणी, लिक्विडीटी तसेच अन्य बँकांचे व्याजदर इ. बाबींचा तुलनात्मक विचार करुन आपल्या बँकेने ठेवींच्या व्याजदरात वेळोवेळी बदल केला आहे.

इतक्या स्पर्धेच्या वातावरणात देखील अहवालाच्या वर्षात आपल्या बँकेच्या ठेवीमध्ये रु. १८.५५ कोटींची वाढ झाली आहे आणि सदरची बाब ही ठेवीदारांचा बँकेवरील विश्वासाची द्योतक आहे. गेल्या ३ वर्षातील बँकेच्या ठेववृध्दीची विगतवारी पुढील प्रमाणे आहे.

(रक्कम रु. कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०२१ | ३१ मार्च २०२२ | ३१ मार्च २०२३ |
|---|---|---|---|
| मुदत ठेवी(टर्म डिपॉझिटस्) | ३२१.४० | ३४३.९३ | ३५३.१४ |
| चालू ठेवी | ३१.०१ | २९.६८ | ३२.९७ |
| सेव्हिंग्ज ठेवी | ६७.३९ | ६७.११ | ७३.१६ |
| **एकूण ठेवी** | **४१९.८०** | **४४०.७२** | **४५९.२७** |

**ठेव विमा :** बँकेत ठेवलेल्या सर्व प्रकारच्या एकत्रित ठेव रक्कम रु. ५.०० लाख पर्यंत विमा संरक्षण उपलब्ध आहे. आपल्या बँकेने त्यासाठी Deposit Insurance and Credit Guarantee Corporation यांच्या कडे अतिशय नियमितपणे विमा हप्ते भरलेले असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| प्रिमियम रक्कम | रक्कम भरायची अंतिम तारीख | रक्कम भरलेली तारीख | विमा कालावधी |
|---|---|---|---|
| रु. ३१.१० लाख | ३१/०५/२०२२ | ३०/०४/२०२२ | एप्रिल २०२२ते सप्टेंबर-२०२२ |
| रु. ३२.४६ लाख | ३०/११/२०२२ | २८/१०/२०२२ | ऑक्टो २०२२ ते मार्च २०२३ |

**घेतलेली कर्जे रु २०,१७ कोटी :** आपल्या बँकेने इतर बँकेत गुंतवणूक केलेल्या ठेव रकमेच्या तारणावर बँकेने प्रसंगोपात ओव्हर-ड्राफ्ट कर्जे घेतली असून ३१ मार्च २०२३ अखेर सदरची रक्कम रु. २०१७.२५ लाख इतकी आहे. बँकेच्या कर्जात साधारपणे जानेवारी ते मार्च २०२३ या कालावधी मध्ये जवळपास रु. ४० कोटीने वाढ झाल्याने, कर्ज वाटप करण्यासाठी ठेवीच्या तारणावर ओव्हर-ड्राफ्ट काढण्यात आलेला आहे.

**गुंतवणूक(सरकारी रोख व इतर) रु. २१६.४८ कोटी :** बँकिंग नियंत्रण कायद्याच्या तरतुदीनुसार बँकेने केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्ज रोख्यात आणि डेव्हलपमेंट बॉण्डमध्ये रु. १६० कोटींची गुंतवणूक केली आहे. त्याशिवाय अतिरिक्त शिल्लक फंड्स रु.५६.४८ कोटींची सुरक्षित आणि फायदेशीर गुंतवणूक अन्य बँकांच्या ठेव योजनेत केली आहे. एकूण गुंतवणूक रु. २१६.४८ कोटी असून गेल्या वर्षाच्या तुलनेत गुंतवणुक रु.१.५२ कोटीने वाढली आहे. याचाच अर्थ आगामी वर्ष २०२३-२४ करीता कर्ज वितरणाकरीता बँकेकडे पुरेसे फंड्स उपलब्ध आहेत.

**कर्जे रु. ३०६.८३ कोटी :** गेल्या वर्षी मार्च २०२२ अखेर बँकेची एकूणे कर्जे रु. २६२.१६ कोटी इतकी होती. अहवालाच्या वर्षात कर्जामधील निव्वळ वाढ ही रु. ४४.६७ कोटींची होऊन ३१ मार्च २०२३ अखेर एकूण येणे कर्जे रु. ३०६.८३ कोटींची झाली.

अहवालाच्या वर्षात कर्जावरील व्याजदरामध्ये बँकांतर्गत तीव्र स्पर्धा दिसून आली. आपल्या बँकेने देखील सोने तारण, गृह कर्जे, वाहन कर्ज, बिझनेस कॅश क्रेडिट या सारख्या कर्ज योजनेचे व्याजदर अतिशय स्पर्धात्मक ठेवले. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले आणि बँकेकडे विविध स्तरामधून कर्जमागणी होऊ लागली. परिणामी, गेल्या वर्षाच्या तुलनेत बँकेची निव्वळ कर्जवाढ ही रु. ४४.६७ कोटी इतकी झाली आहे.

बँकेने विविध क्षेत्रास केलेला कर्ज वितरणाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

(रक्कम रु. लाखांत)

| अं. क्र. | कर्जाचा प्रकार | | ३१/०३/२२ | ३१/०३/२३ |
|---|---|---|---|---|
| १. | हायपोथिकेशन कर्ज | | ४,६४८.२९ | ४,६८७.२६ |
| २. | वेअर हाऊस रिसिटस तारण कर्ज | | २३१.९० | ९०३.९९ |
| ३. | मुदत ठेव तारण कर्ज | | १,९७६.९४ | ३,४१३.८७ |
| ४. | औद्योगिक कर्ज | | ४७.३६ | ७०.८२ |
| ५. | वैयक्तिक कर्ज | | ७४३.८० | ५५४.८८ |
| ६. | क्लीन कॅशक्रेडीट कर्ज | | १५९.३१ | १३६.६८ |
| ७. | सोने तारण कर्ज | | २,६७८.६३ | ३,४८४.६३ |
| ८. | सरकारी कर्ज रोखे व LIC तारण | | - | २९.७७ |
| ९. | वाहन/मशीनरी तारण कर्ज | | २,०९२.१८ | २,४३१.३८ |
| १०. | बांधकाम कर्ज Priority & Non Priority | | २८४.५९ | २०१.२२ |
| ११. | बांधकाम कर्ज (सिद्ध वास्तुवैभव) | | ९७३.३९ | २०६९.९३ |
| १२. | प्रॉपर्टी कर्ज | गृहखरेदीसाठी, | २००.५३ | १४१.११ |
| | | व्यावसायिक | २२६.६५ | २५६.२७ |
| १३. | सहभाग कर्ज | | १,०२४.२५ | ५६८.९४ |
| १४. | शैक्षणिक कर्ज | | - | - |
| १५. | इतर तारणावर कर्ज | | ९,२८७.४८ | १०,५२१.७१ |
| १६. | इतर कर्जे | | ८६७.२९ | ६९१.४५ |
| १७. | सिद्धेश्वर उन्नती कर्ज योजना | | ७०८.८९ | ४९३.४९ |
| १८. | ग्रुप लोन लायबिलीटी | | ६४.९३ | २५.१० |
| | **एकूण** | | **२६,२१६.४१** | **३०,६८२.५१** |

**अग्रक्रम क्षेत्र कर्जे :** आपल्या बँकेने रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार अग्रक्रम क्षेत्र आणि दुर्बल घटक यांना केलेल्या कर्ज वाटपाचे प्रमाण अनुक्रमे ७७.०९% आणि १५.१३% इतके असून रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे पालन केले आहे.

**संचालक कर्जे :** अहवालाच्या वर्षात बँकेच्या संचालक मंडाळाची निवडणूक झाली आणि कांही नवीन सदस्य संचालक मंडळावर निवडून आले आहेत.नूतन संचालकांपैकी कांही सदस्यांना ते संचालक म्हणून निवडून येण्यापूर्वी बँकेकडून त्यांना आणि त्यांच्या फर्मला, नातेवाईकांना कर्जे मंजूर होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम लाखात)

| तपशील | ३१/०३/२०२२ रोजी येणे बाकी | अहवाल वर्षात दिलेले कर्ज | अहवाल वर्षात परतफेड रक्कम | ३१/०३/२०२३ अखेर येणेबाकी | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| एकूण कर्जदार २२<br>संचालक-२<br>नातेवाईक/फर्म-२० | ५३१.९४ | १४५.९० | ११५.४१ | ५६२.४३ | १०.४० |

उपरोक्त कर्जापैकी टर्म लोन्स ह्या कर्जाची मुदत संपेपर्यंत नियमित चालू राहू शकतील तर कॅश क्रेडिट कर्ज खात्यांचे नूतनीकरण न होता कर्जे बेबाक करुन घेतली जातील.

**अनुत्पादित कर्जे (NPA) :** अहवालाच्या वर्षात बँकेच्या थकीत कर्जाच्या वसुलीसाठी युध्दपातळीवर मोहीम हाती घेण्यात आली. त्यामध्ये वसुलीसाठी सतत पाठपूरावा करणे, सरफेसी कायदा आणि सहकारी कायदा अन्वये वसुलीची कारवाई, त्यामध्ये स्थावर मिळकत जप्ती आणि लिलावाने विक्री इत्यादी मार्गाने वसुली करण्यात आली. कांही प्रसंगी कर्जदारांची परिस्थीती बघून त्यांच्याशी चर्चा करुन एक रकमी परतफेड योजने प्रमाणे तडजोडीने कर्जे बेबाक करुन घेतली.

वसुलीचे सर्व सनदशीर मार्ग वापरुन अहवालाच्या वर्षात थकीत कर्जात एकूण वसुली रु. १०.२२ कोटी इतकी झाली तर नवीन **NPA** रु.२.१३ कोटी इतक्या रकमेचे झाले. गेल्या वर्षाच्या तुलनेत बँकेच्या ग्रॉस **NPA** रु. ८.०९ कोटीची घट झाली आणि प्रथमच बँकेचे ग्रॉस **NPA** प्रमाण १०% पेक्षा कमी होऊन ८.६०% इतके राहिले. तसेच बँकेचे नेट **NPA** प्रमाण १.८५% इतके राहिले आहे. आगामी काळात ग्रॉस **NPA** चे प्रमाण ५% पेक्षा कमी आणि नेट **NPA** ०% चे उद्दिष्ट ठेवले आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे बँकेने अनुत्पादित कर्जासाठी पुरेशी तरतूद करुन ठेवली आहे. बँकेने निर्लेखित केलेल्या कर्जामध्ये अहवालाच्या वर्षात रु. ९.६९ लाख इतकी वसुली आली असून सदरची रक्कम बँकेच्या उत्पन्नात जमा करण्यात आली आहे.

**नफा वाटणी :** दि. ३१ मार्च २०२३ अखेर संपलेल्या वर्षात बँकेस कर्जावर आणि गुंतवणुकीवर मिळालेल व्याज आणि कमिशन व इ तर उत्पन्न एकूण रु. ४७७८.९५ लाख इतके झाले. तर ठेवीवर आणि घेतलेल्या कर्जावर दिलेले व्याज, पगार खर्च, इतर प्रशासकीय खर्च रु. ३९७२.४२ लाख इतका वजा जाऊन बँकेस ढोबळ नफा रु. ८०६.५३ लाख इतका झाला. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार अनुत्पादित कर्जाची तरतूद आणि इतर वैधानिक तरतुदी वजा जाता करपूर्व नफा रु. ६९६.९९ लाख इतका झाला आहे. आयकरासाठी रु. १८५.०० लाखाची तरतूद वजा होऊन निव्वळ नफा रु. ५११.९९ लाख इतका शिल्लक राहिला आहे. नफा-तोटा खात्यातील शिल्लक रक्कम रु. १.५१ लाख धरुन नफा तोटा खात्यात शिल्लक रक्कम रु. ५१३.५० लाख आहे.

सदर नफ्याची वाटणी खालीलप्रमाणे करण्याची संचालक मंडळाची शिफारस असून त्यास सभासदांनी मंजूरी द्यावी अशी संचालक मंडळाच्या वतीने विनंती करतो.

| तपशील | रक्कम |
|---|---|
| रिझर्व्ह फंड आणि आकस्मित निधी (३२.५०% पेक्षा कमी नाही) | १,६८,९९,२७१.१३ |
| लाभांश १० % प्रमाणे | १,६०,००,०००.०० |
| इमारत निधी | १,००,००,०००.०० |
| गुंतवणुक चढ उतार निधी (IFR) | ५०,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सव निधी | ३०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | २,००,०००.०० |
| सेवक कल्याण निधी | १,००,०००.०० |
| पुढे ओढलेला नफा | १,५१,०००.०० |
| **एकूण** | **५,१३,५०,२७१.१३** |

**टीप :** लाभांश वाटून शिल्लक राहिलेली रक्कम लाभांश समकरण निधीस वर्ग केली जाईल. तसेच, लाभांश वाटण्यासाठी रक्कम कमी पडल्यास ती लाभांश समकरण निधीतून घेतली जाईल.

**लेखा परीक्षण व तपासणी :** अहवालाच्या वर्षासाठी बँकेचे वैधानिक लेखा परीक्षण हे पांढरे आणि कंपनी चार्टर्ड अकाऊंटंट्स यांनी केले आहे. बँकेच्या कामकाजाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले असून बँकेच्या कामकाजात सुधारणा व्हावी आणि बँकेची प्रगती व्हावी यासाठी त्यांनी कांही बहुमोल सूचना केल्या आहेत. वर्ष २०२२-२३ करीता त्यांनी बँकेचा ऑडीट वर्ग ''**अ**'' कायम ठेवला आहे.

त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशांनुसार बँकेचे समवर्ती लेखा परीक्षण (Con-current Audit) तज्ञ आणि व्यावसायिक चार्टर्ड अकौटंटस् यांनी केले आहे. श्री. व्ही.एस. सक्करशेट्टी आणि कंपनी., बी.जे. शास्त्री आणि कंपनी, मे. पाटील उदगिरी अ‍ॅन्ड असो., एन.आर. काबरा आणि कंपनी, जुगल बाहेती आणि कंपनी, आणि मे. ओंकारेश्वर उटगे आणि कंपनी, नागप्पा शेटे अ‍ॅन्ड कंपनी यांनी अतिशय दक्षतेने बँकेचे समवर्ती लेखा परीक्षण केले आहे. त्यांनी देखील बँकेच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी काही मोलाच्या सूचना केल्या आहेत.

**रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन :** कोरोना आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२२ अखेरच्या बँकेच्या सांपत्तिक स्थितीवर आधारुन रिझर्व्ह बँकेचे तपासणी अधिकारी श्री संजय अग्रवाल आणि श्री संदीप यांनी केले आहे. त्यांनी देखील बँकेच्या एकंदर कामकाजाबद्दल आणि प्रगीतीबाबत समाधान व्यक्त केले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या Know Your Customer- KYC या विषयावर दिशानिर्देश दिलेल असून, त्यानुसार सर्व खातेदारंचे Low Risk, Medium Risk, High Risk असे वर्गीकरण करणे आवश्यक असून त्याचा प्रत्येक सहा महिन्याने आढावा घेणे देखील आवश्यक आहे. आपल्या बँकेत एकूणच हाय रिस्क खात्यांचे प्रमाण अतिशय नगण्य असल्याने सदरचा सहामाही आढावा घेण्याचे काम अनावधानाने राहून गेले. रिझर्व्ह बँकेचे इन्स्पेक्शनमध्ये सदरची बाब लक्षात आल्यानंतर रिझर्व्ह बँकेने आपल्या बँकेस शो-कॉज नोटीस दिली. बँकेने त्यास समर्पक उत्तर आणि खुलासा दिला होता. मात्र रिझर्व्ह बँक आपल्या मुद्यावर आग्रही असल्याने त्यांनी बँकेस रु. १.५० लाखाचा दंड केला आहे. मात्र बँकेने इत:पर आपल्या कार्यप्रणालीत सुधारणा करुन दर सहा महिन्याने Risk Categorization चा आढावा घेण्यास सुरवात केली आहे.

**शोक संवेदना :** अहवाल सालात राष्ट्रीय स्तरावरील काही विभूती दिवंगत झाल्या त्यात प्रामुख्याने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मातोश्री श्रीमती हिराबेन मोदी, देशाचे रक्षण करताना आघाडीवर शत्रूशी लढता लढता काळाच्या पडद्याआड गेलेले वीर जवान. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप मठाचे मठाधिपती ष. ब्र. डॉ. रेणूक शिवाचार्य महास्वामी, विजयपूर येथील ज्ञानयोगी श्री. सिध्देश्वर महास्वामी, बँकेचे माजी अधिकारी विजयकुमार बोधणे, आपल्या बँकेचे निवृत्त अधिकारी प्रकाश दामोदर सोनटक्के यांनी आपली इहलोकाची यात्रा संपविली. तसेच बँकेचे कर्मचारी तानाजी रामचंद्र पाटील यांचे दुर्देवाने अपघाती निधन झाले. त्याच प्रमाणे बँकेशी संबंधित असलेले अनेक ज्ञात व अज्ञात दिवंगत नागरिक, सभासद, ग्राहक, यांचे निधन झाले. त्या सर्वांना या प्रसंगी भावपूर्ण श्रध्दांजली व्यक्त करतो.

**आभार** : बँकेच्या हिताच्या दृष्टीने ज्या अनेक हितचिंतकानी बहुमोल सहकार्य आणि मार्गदर्शन केले त्या सर्वांचा नामनिर्देश या ठिकाणी करणे शक्य नसले तरी प्रामुख्याने श्री. सिद्धेश्वर देवस्थान, सोलापूरचे अध्यक्ष श्री. धर्मराज काडादी, दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री. राजशेखर वि. शिवदारे, श्रीमद् वीरशैव महाजन सभा विद्यार्थी बोर्डींगचे अध्यक्ष श्री.मल्लिनाथ विभुते तसेच महाराष्ट्र वीरशैव सभा, पांजरापोळ संस्था, श्री. एस.एस. साबळे वीरशैव ट्रस्ट इत्यादिकांचा उल्लेख करणे मी माझे कर्तव्य समजतो. बँकेचे संस्थापक, सहकार महर्षी कै. वि. गु. शिवदारे अण्णा यांनी आखून दिलेल्या मार्गाने बँकेची यशस्वी वाटचाल सुरु आहे. यापुढेही त्यांनी घालून दिलेल्या आदर्शाप्रमाणेच बँक पुढील मार्गक्रमण करेल हे मी याप्रसंगी विशेषत्वाने नमूद करु इच्छितो.

तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स को-ऑप. असोसिएशन लि. सोलापूर, महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स फेडरेशन लि. मुंबई विभागीय सहकारी निबंधक, सह.संस्था पुणे, जिल्हा उपनिबंधक, सह. संस्था. सोलापूर,जिल्हा विशेषलेखा परिक्षक, सह. संस्था, सोलापूर. तसेच बँकेचे वैधानिक लेखापरीक्षक, समवर्ती लेखापरिक्षक व कायदेशीर सल्लागार या सर्व अधिकारी वर्गांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाचा बँकेला सतत फायदा झालेला आहे. आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

बँकेला सातत्याने प्रगतीपथावर अग्रेसर ठेवण्यासाठी संचालक मंडळातील सदस्यांनी दिलेल्या वेळेच्या व मार्गदर्शनाच्या बहुमुल्य योगदानाचा मी कृतज्ञता पूर्वक उल्लेख करतो, बँकेचे ठेवीदार, सभासद, कर्जदार, ग्राहक, हितचिंतक अशा सर्व ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी बँकेच्या प्रगतीसाठी व उत्कर्षासाठी आम्हांस सदैव सहकार्य दिलेले आहे. तेव्हा हिच सदिच्छा व सद्भावना वृध्दींगत करुन बँकेच्या प्रगतीसाठी सहकार्य द्यावे अशी कळकळीची विनंती करुन पुन:श्च एकदा सर्वांचे आभार मानतो. संचालक मंडळाच्यावतीने बँकेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफ्याची वाटणी इ. आपल्या समोर ठेवीत आहे, त्यास मंजुरी द्यावी ही विनंती.

**।। जय हिंद, जय सहकार ।।**

आपला विश्वासू,
**प्रकाश संगप्पा वाले**
चेअरमन

## प्रगतीचा तक्ता

(रक्कम रु.लाखात)

| अ.क्र. | तपशिल | २०१८-२०१९ | २०१९-२०20 | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ऑडीटवर्ग | अ | अ | अ | अ | अ |
| २. | सभासद संख्या | २१११३ | २३०२४ | २३५८४ | २३,७०७ | २३,११५ |
| ३. | अ) भाग भांडवल | १२५८.७१ | १३२५.९४ | १४२५.२७ | १,४४८.८८ | १,५१६.00 |
| | ब) रिझर्व्ह फंड | १५९७.२७ | १७१५.९९ | १८६५.५५ | २,०१२.९३ | २,१८५.५८ |
| | क) इतर फंड | २३१४.०७ | २४७३.९३ | २८१५.६३ | ३,२४६.८२ | ३,४७५.७३ |
| | **एकूण (अ+ब+क)** | **५१७०.०५** | **५५१५.८६** | **६,१०६.४५** | **६,७०८.६३** | **७,१७७.३१** |
| ४. | ठेवी | ३७२४६.१८ | ४००५६.१८ | ४१९८०.०४ | ४४,०७२.२१ | ४५,९२७.१४ |
| ५. | गुंतवणूक | १८४८८.३१ | २१९६४.८४ | २०३७१.२५ | २१,४९५.८९ | २१,६४७.९६ |
| ६. | दिलेले कर्ज | २१३६०.१८ | २१५३१.६६ | २७०५७.०९ | २६,२१६.४१ | ३०,६८२.५१ |
| ७. | निव्वळ नफा | ३०२.९९ | ३०३.४२ | ३२७.७० | ४२२.९९ | ५११.९९ |
| ८. | खेळते भांडवल | ४३१०७.६१ | ४६८८०.६५ | ५१,२३४.५९ | ५१,७०७.१५ | ५६,०८०.७१ |
| ९. | डिव्हीडंड | १०% | | ९.०० | १०%शिफारस | १०%शिफारस |

# सन-२०२३-२४ अंदाजपत्रक

(रूपये लाखात)

| अ.क्र. | उत्पन्न | २०२२-२३ अंदाजे उत्पन्न | २०२२-२३ प्रत्यक्ष उत्पन्न | २०२३-२४ अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | कर्ज व गुंतवणूकीवरील व्याज | ४५१५.०० | ४५४२.७९ | ४९६५.०० |
| २. | हुंडणावळ | १५.०० | १०.४२ | १५.०० |
| ३. | इतर उत्पन्न | २५०.०० | २२५.७४ | २५०.०० |
| | **एकूण** | **४७८०.००** | **४७७८.९५** | **५२३०.००** |

| अ.क्र. | खर्च | २०२२-२३ अंदाजे खर्च | २०२२-२३ प्रत्यक्ष खर्च | २०२३-२४ अंदाजे खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | ठेवी व कर्जावरील व्याज | २५५०.०० | २५३२.६७ | २७००.०० |
| २. | पगार भत्ते व भ.नि.नि, | ९००.०० | ९९२.०४ | १०२५.०० |
| ३. | संचालक मंडळ भत्ते | ३.०० | २.२८ | १०.०० |
| ४. | भाडे, कर, विमा, वीज, इ. | १४०.०० | ११३.५५ | १५०.०० |
| ५. | कोअर बँकींग | ४०.०० | ३३.७२ | ४०.०० |
| ६. | कोर्ट खर्च कायदा सल्लागार | ५.०० | २.२८ | ५.०० |
| ७. | टपाल, तार व दुरध्वनी खर्च | ७.०० | १०.४१ | १०.०० |
| ८. | लेखापरिक्षकाची फी | २०.०० | १८.९४ | २३.०० |
| ९. | झीज व दुरूस्ती | ११०.०० | १००.८८ | ११५.०० |
| १०. | स्टेशनरी, छपाई, व जाहिरात | २२.०० | २१.८७ | २५.०० |
| ११. | पिग्मी कमिशन | ५२.०० | ४७.८४ | ५२.०० |
| १२. | इतर खर्च | ६०.०० | ९५.९४ | १००.०० |
| १३. | तरतुदी | १७५.०० | १०२.०० | १५०.०० |
| १४. | आयकर | २२०.०० | १९२.५४ | २१५.०० |
| १५. | निव्वळ नफा | ४७६.०० | ५११.९९ | ६१०.०० |
| | **एकूण** | **४७८०.००** | **४७७८.९५** | **५२३०.००** |

## ३१/०३/२०२३ अखेरचे संकलित ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रूपये पैसे | भांडवल व देणी | शेड्यूल | दि.३१/०३/२०२३ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| | **१) भाग भांडवल** | | |
| २५,००,००,०००.०० | अ) अधिकृत भागभांडवल (१ कोटी भागाचे प्रत्येकी रू.२५/- प्रमाणे) | | २५,००,००,०००.०० |
| **१४,४८,८७,५००.००** | ब) वसूल भाग भांडवल (६०,६३,९९०) भागाचे प्रत्येक रू.२५/- प्रमाणे) | | **१५,१५,९९,७५०.००** |
| **५२,५९,७५,१३८.४५** | **२) गंगाजळी व इतर निधी** | | **५६,६१,३१,३७२.८२** |
| २०,१२,९२,७७३.३७ | अ) रिझर्व्ह फंड | २१,८५,५७,९०९.५४ | |
| ५,८६,०१,०००.०० | ब) इमारत निधी | ६,२६,०१,०००.०० | |
| ३०,५१,४७६.७३ | क) लाभांश समाकरण निधी | ३०,५१,४७६.७३ | |
| १९,८४,५९,६६५.९४ | ड) संशयीत व बुडीत कर्ज निधी | २०,६७,५२,७६४.१४ | |
| १,००,००,०००.०० | इ) स्टँडर्ड असेट साठी तरतूद | १,१५,००,०००.०० | |
| २८,४६,०२७.१५ | ई) धर्मादाय निधी | २८,४६,०२७.१५ | |
| ४६,१५,७५०.०० | च) सभासद कल्याण निधी | ४८,१५,७५०.०० | |
| २५,५१,९५२.२६ | छ) सेवक कल्याण निधी | २७,५१,९५२.२६ | |
| २,३७,३४,१३७.०० | ज) गुंतवणूक चढउतार निधी (I.F.R.) | २,८७,३४,१३७.०० | |
| १६,८७,०००.०० | झ) गुंतवणूक घसारा निधी | ३१,८७,०००.०० | |
| ०.०० | प) प्रोव्ही.फॉर लाँग टर्म फायनान्स Reserve for BDDR & Special Reserve (U/s 36 (i) (viii) I.T.Act) | ०.०० | |
| ५७,०२,०००.०० | फ) सुवर्ण महोत्सव निधी | ७०,००,०००.०० | |
| २१,९५,१३९.०० | ब) निवडणुक खर्च तरतुद | २१,९५,१३९.०० | |
| १५,००,०००.०० | भ) सभासद शिक्षण निधी | १५,००,०००.०० | |
| ३,६८,९५९.०० | म) रिझर्व्ह फॉर डिफर्ड टॅक्स लायबलिटी | ३,६८,९५९.०० | |
| ५,००,०००.०० | य) कोअर बँकिंग कॉम्प्युटराझेशन खर्च निधी | ३६,००,०००.०० | |
| २६,००,०००.०० | र) प्रोव्ही. फॉर सीटीएस लॉस | २६,००,०००.० | |
| ०.०० | ल) प्रोव्ही. फॉर FDR Invenstment | ०.०० | |
| ०.०० | व) सन २०१९-२० लाभांश | ०.०० | |
| ६२,६९,२५८.०० | श) ५% तरतूद कोविड पुनर्बांधणी खाते | ४०,६९,२५८.०० | |
| **४,४०,७२,२०,९३५.०४** | **३) ठेवी व इतर खाते** | | **४५९,२७,१३,७११.९८** |
| ३,४३,९३,१३,३९५.०० | अ) मुदत ठेव व इतर ठेवी | ३,५३,१४,२२,५०९.१८ | |
| ६७,१०,६०,००८.११ | ब) सेव्हिंग्ज ठेव | ७३,१५,७८,३३८.२१ | |
| २७,३१,६०,०५५.५० | क) चालू ठेव | ३२,५८,१२,५११.९४ | |
| २,३६,८७,४७६.४३ | ड) कर्ज खात्यावरील जमा रक्कम | ३९,००,३५२.६५ | |
| **२०,००,०००.००** | **४) घेतलेली कर्ज (ठेवीच्या तारणावरील ओव्हर ड्राप्ट)** | | **२०,१७,२४,७१९.००** |
| ०.०० | अ) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक | ५,९५,४७,४६२.०० | |
| ०.०० | ब ) सुर्योदय स्मॉल फायनान्स बँक | ८,४१,६६,४५६.०० | |
| २०,००,०००.०० | क) इक्कीटास स्मॉल फायनान्स बँक | ४,००,००,०००.०० | |
| ०.०० | ड) शामराव विठ्ठल को-ऑप. बँक | १,८०,१०,८०१.०० | |
| **५०८,००,८३,५७३.४९** | **बेरीज पुढील पानावर** | | **५५१,२१,६९,५५३.८०** |

## ३१/०३/२०२३ अखेरचे संकलित ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रूपये पैसे | जिंदगी व येणी | शेड्यूल | दि.३१/०३/२०२३ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **१६,८४,५६,०१५.२९** | **१) रोख व बँकेतील शिल्लक** | | **१०,७७,६७,८२७.९४** |
| १६,०७,५३,५१८.४२ | अ) रोख शिल्लक | ९,२५,५८,०६४.०७ | |
| १२,९८,२२२.०० | ब) एमएससी बँक मुंबई | १९,५५,०५५.०० | |
| ०.०० | क) ए.टी.एम. कॅश | ०.०० | |
| ६४,०४,२७४.८७ | ड) सोलापूर डिसीसी करंट | १,३२,५४,७०८.८७ | |
| **७२,०१,१८,०८३.८८** | **राष्ट्रीयकृत व इतर बँकेतील शिल्लक** | | **६८,८४,९८,५७७.९७** |
| ७,३०,४३,४४६.८८ | अ) राष्ट्रीयकृत बँकेतील चालू खात्यातील शिल्लक | १२,३९,३३,९०७.९७ | |
| ०.०० | ब) इतर बँकेतील चालू खात्यातील शिल्लक | ०.०० | |
| ६४,७०,७४,६३७.०० | क) इतर बँकेतील मुदत ठेवी | ५६,४५,६४,६७०.०० | |
| **१,५०,२५,१४,११२.००** | **२) गुंतवणूक** | | **१,६०,०२,३०,९००.००** |
| | अ) १.केंद्र सरकारचे कर्ज रोखे | | |
| १,५०,२४,१३,०६२.०० | दर्शनी किंमत | १,६०,०१,२९,८५०.०० | |
| ०.०० | बाजार भावाने किंमत | | |
| ०.०० | २.केंद्र सरकारचे ट्रेझरी बील | ०.०० | |
| ०.०० | ब) डी.सी.सी. बँकेतील मुदत ठेवी | ०.०० | |
| १,०१,०५०.०० | क) सहकारी बँकेचे भाग | १,०१,०५०.०० | |
| ०.०० | ड) मुच्युअल फंड | ०.०० | **०.००** |
| **०.००** | **३) अल्प सूचना व कॉल डिपॉझिट** | | |
| **२,६२,१६,४१,१३१.२९** | **४) कर्जे** | | **३०६,८२,५१,३८७.००** |
| **१,२५,१४,९७,६७२.८१** | **अ) अल्प मुदत कर्जे** | | |
| ०.०० | i)सरकारी रोखे तारणावर | ०.०० | |
| १,२३,५५,६६,८१५.५६ | ii) तारणी | १,५४,०१,७४,१३८.५६ | |
| १,५९,३०,८५७.२५ | iii) विना तारणी (कर्जदार व जामिनदार यांच्या वैयक्तीक तारणावर) | १,३६,६७,६७९.७२ | |
| **९३,८८,२२,०१६.०१** | **ब) मध्यम मुदत कर्जे** | | |
| ०.०० | i) सरकारी रोखे तारणावर | ०.०० | |
| ७१,४७,८७,४००.१० | ii) तारणी | ७३,०६,११,५६७.६३ | |
| २२,४०,३४,६१५.९१ | iii) विना तारणी (कर्जदार व जामिनदार यांच्या वैयक्तीक तारणावर) | १६,३१,९३,३९२.३८ | |
| **४३,१३,२१,४४२.४७** | **क) दीर्घ मुदत कर्जे** | | |
| ०.०० | i) सरकारी रोखे तारणावर | ०.०० | |
| ४३,१३,२१,४४२.४७ | ii) अन्य तारणावर | ६२,०६,०४,६०८.७१ | |
| **५०१,२७,२९,३४२.४६** | **बेरीज पुढील पानावर** | | **५४६,४७,४८,६९२.९१** |

## ३१/०३/२०२३ अखेरचे संकलित ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रूपये पैसे | भांडवल व देणी | शेड्यूल | दि.३१/०३/२०२३ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| ५,०८,००,८३,५७३.४९ | मागील पानावरील बेरीज | | **५,५१,२१,६९,५५३.८०** |
| 0.00 | **५) वसूलीस आलेली बिले(उलट बाजूने)** | | 0.00 |
| १,६१४.00 | **६) शाखा समन्वय** | | 0.00 |
| ४७,२९०.00 | **७) रिझर्व्ह फॉर डिफर्ड टॅक्स लायबलिटी** | | ४७,२९०.00 |
| १८,३३,१४,७९३.0५ | **८) उत्पन्न क्षमता नसलेल्या जिंदगी वरील थकीत व्याज निधी** | | १९,७८,७७,६४४.६८ |
| ५९,0१,१३६.00 | अ) थकबाकी व्याज रिझर्व्ह | ४२,७३,५२१.00 | |
| १,६४,३४,९७५.७५ | ब) थकीत कर्जावरील दाव्याचे व्याज | १,0८,0७,३0६.७५ | |
| १५,८६,४३,४७४.९९ | क) थकीत व्याज एन.पी.ए. | १८,0५,७५,0३२.0४ | |
| २३,३५,२0६.३१ | ड) सेवक बांधकाम कर्ज व्याज येणे | २२,२१,७८४.८९ | |
| **३८,३८,४४३.00** | **९) देणे व्याज** | | **४३,0६,६७७.00** |
| ३८,३८,४४३.00 | अ) ठेवीवरील व्याज देणे | ४३,0६,६७७.00 | |
| 0.00 | ब) घेतलेल्या कर्जावरील व्याज देणे | 0.00 | |
| **३,६0,५७,३९४.५७** | **१0) इतर देणे आणि तरतूदी** | | **३,५९,२३,७२0.५२** |
| ७0,४३,४८८.९0 | अ) लाभांश देणे | ८८,0७,१९२.२0 | |
| २६,१७,९४४.९५ | ब) पे-ऑर्डर देणे | १,२५,0३,६९७.00 | |
| ६२,00,000.00 | क) इन्कमटॅक्स तरतूद | ३५,00,000.00 | |
| १,१३,६३,६८0.८४ | ड) किरकोळ देणे | ७0,२२,६३७.८२ | |
| ८८,३२,२७९.८८ | इ) इतर | ४0,९0,१९३.५0 | |
| **४,२४,४९,९६५.२७** | **११) नफा-तोटा खाते** | | **५,१३,५0,२७१.१३** |
| १,५१,000.00 | मागील ताळेबंदाप्रमाणे शिल्लक | १,५१,000.00 | |
| ४,२२,९८,९६५.२७ | चालू वर्षाचा नफा | ५,११,९९,२७१.१३ | |
| **२,१0,५४,१६७.६३** | **१२) हमी पोटीचे दायित्व** | | **२,४१,८२,५0२.२४** |
| ६९,८४,0८२.00 | अ) बँक गॅरंटीज् | ७९,८९,५१0.00 | |
| ४७,४८,८८६.00 | ब) Disputed Income Tax | ४७,४८,८८६.00 | |
| ५,६२,९२५.00 | क) Disputed Salary Claim | ५,६२,९२५.00 | |
| ८७,५८,२७४.६३ | ड) RBI DEAF | १,0८,८१,१८१.२४ | |
| **५३४,५७,९३,0७३.३८** | **एकूण बेरीज** | | **५८0,१६,७५,१५७.१३** |

**प्रकाश सं. वाले**
चेअरमन

**नरेंद्र म. गंभिरे**
व्हा. चेअरमन

**राम ब. शर्मा**
मुख्य कार्यकारी अधिकारी

याच तारखेचा सोबत जोडलेल्या अहवालास अधिन राहुन
**पांढरे ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंटस्

**एस. बी. पांढरे**
चार्टर्ड अकौंटंटस्
Partner M. No.: 016834
FRN No.: 107292W
Panel Reg. No.: 103275
UDIN : 23016834BGSVAZ4271

Place: Solapur
Date: 27/06/2023

## ३१/०३/२०२३ अखेरचे संकलित ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रूपये पैसे | जिंदगी व येणी | शेड्यूल | दि.३१/०३/२०२३ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **५०१,२७,२९,३४२.४६** | मागील पानावरील बेरीज | | **५४६,४७,४८,६९२.९१** |
| **२४,६०,५०,५९६.७२** | **५) येणे व्याज** | | **२५,२०,३७,५४५.६८** |
| ६,८६,३६,९३९.६७ | अ) गुंतवणूकीवरील | ५,८४,३३,४२२.०० | |
| १५,८६,४३,४७४.९९ | ब) एन.पी.ए.येणे व्याज | १८,०५,७५,०३२.०४ | |
| १,६४,३४,९७५.७५ | क) थकीत कर्जावरील दाव्याचे व्याज | १,०८,०७,३०६.७५ | |
| २३,३५,२०६.३१ | ड) सेवक बांधकाम कर्ज व्याज येणे | २२,२१,७८४.८९ | |
| ०.०० | **६) वसुलीसाठी आलेली बीले** | | ०.०० |
| ०.०० | **७) शाखा समन्वय** | | ०.०० |
| **४,८७,५८,८९५.३६** | **८) मालमत्ता** | | **४,९८,१९,५०७.३१** |
| ३,६१,३२,९९९.१६ | अ) जागा व इमारत | ३,२८,१८,४७७.१६ | |
| १,२६,२५,८९६.२० | ब) फर्निचर, कॉम्प्यूटर व इतर सामान | १,७०,०१,०३०.१५ | |
| **३,८२,५४,२३८.८४** | **९) इतर मालमत्ता** | | **३,५०,६९,४११.२३** |
| १५,७९,०६७.०० | अ) इतर संस्थेकडील ठेवी | १६,१४,०६७.०० | |
| ७,६८,०९६.०० | ब) प्रिटींग व स्टेशनरी स्टॉक | ९,४२,८६९.०० | |
| ०.०० | क) समाशोधन | ०.०० | |
| ४१,०४,७८०.०० | ड) इन्कमटॅक्स येणे | ४१,०४,७८०.०० | |
| ६४,५६,४४१.५९ | इ) ॲडव्हान्स | १७,८४,७७५.५९ | |
| २,५३,४५,८५४.२५ | ई) इतर येणे | २,६६,२२,९१९.६४ | |
| **२,१०,५४,१६७.६३** | **१०) हमी पोटीचे दायित्व** | | **२,४१,८२,५०२.२४** |
| ६९,८४,०८२.०० | अ) बँक गॅरंटीज् | ७९,८९,५१०.०० | |
| ४७,४८,८८६.०० | ब) Disputed Income Tax | ४७,४८,८८६.०० | |
| ५,६२,९२५.०० | क) Disputed Salary Claim | ५,६२,९२५.०० | |
| ८७,५८,२७४.६३ | ड) RBI DEAF | १,०८,८१,१८१.२४ | |
| **५,३४,५७,९३,०७३.३८** | **एकूण बेरीज** | | **५,८०,१६,७५,१५७.१३** |

**तुकाराम जि. काळे** संचालक — **अशोक अ. लांबतुरे** संचालक — **पशुपतीनाथ वि. माशाळ** संचालक — **सौ. सुचेता मि. थोबडे** संचालिका

**सौ. रुपाली ब. बिराजदार** संचालिका — **ॲड. मल्लिनाथ क. पाटील** संचालक — **शिवानंद ब. कोनापुरे** संचालक — **बाळासाहेब म. आडके** संचालक — **भीमाशंकर बा. म्हेत्रे** संचालक

**इरप्पा ब. सालक्की** संचालक — **प्रकाश म. हत्ती** संचालक — **सिध्देश्वर सु. मुनाळे** संचालक — **महेश ज. सिंदगी** संचालक

**ॲड. धानय्या गु. चिवरी** तज्ञ संचालक — **श्रीधर हे. रिसबुड (C.A.)** तज्ञ संचालक — **संजय शि. घाळे** कार्यलक्षी संचालक — **राजेश शां. कलशेट्टी** कार्यलक्षी संचालक

## ०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ अखेरचे संकलित नफा-तोटा पत्रक

| दि.३१/०३/२०२२ रूपये पैसे | खर्च | शेड्यूल | दि.३१/०३/२०२३ रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **२४,६२,९०,८५६.००** | **१) ठेवी / कर्जावर दिलेले व्याज** | | **२५,३२,६६,९१५.१९** |
| २४,२०,६९,८४२.०० | अ) ठेवीवर दिलेले व्याज | २५,२७,०४,८५२.१९ | |
| ४२,२१,०१४.०० | ब) घेतलेल्या कर्जावर दिलेले व्याज | ५,६२,०६३.०० | |
| **१०,१३,९६,८४४.२०** | **२) पगार, भत्ते व भविष्य निर्वाह निधी** | | **९,९२,०३,५४१.५०** |
| **२,४९,२३०.००** | **३) संचालक मंडळाचे भत्ते** | | **२,२८,२३०.००** |
| **१,१७,३२,३८४.००** | **४) भाडे, कर विमा, वीज खर्च इ.** | | **१,१३,५५,०४५.४४** |
| **६,४९,३६३.००** | **५) कोर्ट खर्च, कायदा सल्लागार फी** | | **२,२८,२३६.००** |
| **५,९४,९६०.७४** | **६) टपाल, तार व दुरध्वनी खर्च** | | **१०,४१,२६०.८३** |
| **१६,७३,५७५.००** | **७) लेखापरिक्षकाची फी** | | **१८,९४,२०५.००** |
| **३१,२१,३९६.७६** | **८) झीज व दुरूस्ती** | | **६३,९५,४९३.४८** |
| **२०,३२,२३४.७०** | **९) स्टेशनरी, छपाई व जाहिरात** | | **२१,८७,२९८.०१** |
| १०,२२,७२४.०० | अ) स्टेशनरी व प्रिंटींग | १७,०२,१३९.०१ | |
| १०,०९,५११.०० | ब) जाहिरात | ४,८५,१५९.०० | |
| **१,६९,०२,२९५.५८** | **१०) इतर खर्च** | | **२,१४,४१,१३९.३०** |
| ७,२८,७७६.५८ | अ) वाहन खर्च | ६,१९,७३५.९१ | |
| ६,८३३.०० | आ) कार्यक्रमांसाठी झालेला खर्च | १,५०,०५६.०० | |
| ५०,६२,२२६.०० | इ) कमीशन (पिग्मी) | ४७,८३,८६२.७६ | |
| ५,५४,४२३.०० | ई) दुरूस्ती व देखभाल | ७,१९,६५७.५० | |
| १,०५,४७,०३७.०० | उ) किरकोळ खर्च | १,५१,६७,८२७.१३ | |
| **५,६०,७६,२५७.००** | **११) तरतूदी** | | **२,९४,५४,४६०.००** |
| २,१२,००,०००.०० | अ) इनकम टॅक्स | १,८५,००,०००.०० | |
| १,७६,२५७.०० | आ) इनकम टॅक्स २०२१-२२ | ०.०० | |
| ३,२२,००,०००.०० | इ) संशयित बुडीत निधी खर्च | ७२,००,०००.०० | |
| ३,००,०००.०० | ई) BDDR रिजर्व्ह [Sec 36(i)(viii)] | ०.०० | |
| ०.०० | उ) प्रोव्ही. फॉर FDR Investment | ०.०० | |
| ०.०० | ऊ) रिझर्व्ह फॉर स्टॅटर्ड असेट्स | ७,५४,४६०.०० | |
| २०,००,०००.०० | ए) ५% तरतूद कोविड पुनर्बांधणी खाते | ०.०० | |
| ०.०० | ऐ) Investment fluctuation Reserve | ०.०० | |
| | ओ) Investment Depriciation Reserve ID | १५,००,०००.०० | |
| | औ) Reserve for Standard Asset | १५,००,०००.०० | |
| **४,२२,९८,९६५.२६** | **१२) निव्वळ नफा** | | **५,११,९९,२७१.१३** |
| **४८,३०,१८,३६२.०४** | **एकूण बेरीज** | | **४७,७८,९५,०९५.८८** |

| प्रकाश सं. वाले | नरेंद्र म. गंभिरे | राम ब. शर्मा |
|---|---|---|
| चेअरमन | व्हा. चेअरमन | मुख्य कार्यकारी अधिकारी |

याच तारखेचा सोबत जोडलेल्या अहवालास अधिन राहुन
**पांढरे ॲन्ड कंपनी.**
चार्टर्ड अकौंटंटस्

**एस. बी. पांढरे**
चार्टर्ड अकौंटंटस्
Partner, M. No.: 016834
FRN: 107292W
Panel Reg. No.: 103275
UDIN : 23016834BGSVAZ4271

Place: Solapur
Date: 27/06/2023